आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२६जानेवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर शानदार संचलनसोहळा /ऑपरेशन सिंदूरच्या प्रारूपासह देशाच्या सामरिक सामर्थ्याचं आणि सांस्कृतिक वारशाचं समृद्ध दर्शन

- राज्यात ठिकठिकाणी प्रजासत्ताकदिनानिमित्त ध्वजवंदनेचे कार्यक्रम

- महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक वाढीचं शक्तिशाली इंजिन असल्याचं राज्यपालांचं प्रतिपादन

**आणि**

- सातारा जिल्ह्यात मेफेड्रॉन या अंमली पदार्थाचं उत्पादन करणारं एक केंद्र उद्ध्वस्त करून ५५ कोटी रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त

**<><><><><>**

देशाचा ७७वा प्रजासत्ताक दिन आज सर्वत्र साजरा होत आहे. नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत सेनादलं, निमलष्करी दलं  तसंच सांस्कृतिक पथकांच्या शानदार संचलनाने मानवंदना दिली. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ....

**व्हॉईस कास्ट**

*(स्वातंत्र्याचा मंत्र वंदे मातरम आणि समृद्धीचा मंत्र आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर आधारित शानदार संचलन सोहळा आज नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर संपन्न झाला. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला फॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, इतर केंद्रीय मंत्री संरक्षण दलांचे प्रमुख तिन्ही सेनादलांचे प्रमुख आणि इतर वरिष्ठ अधिकारी,*

*लोकप्रतिनिधी, या सोहळ्यासाठी देशभरातून आमंत्रित केलेले विशेष पाहुणे आणि हजारोंच्या संख्येने जनसमुदाय हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते. ऑपरेशन सिंदूरचं प्रारूप दाखवणारा लष्कराचा चित्ररथ, ब्राह्मोस आणि एस फोर हंड्रेड क्षेपणास्त्र, अर्जुन रणगाडा, १६ लढाऊ विमानं, आणि भारताच्या सामरिक सामर्थ्याचं दर्शन घडवणारी शस्त्रास्त्रं हे संचलनाचं प्रमुख आकर्षण होतं. बॅटल ॲरे पद्धतीने म्हणजे प्रत्यक्ष युद्धभूमीवरची व्यूहरचना दाखवणारं संचलन प्रथमच प्रजासत्ताकदिनी पहायला मिळालं. अनेक पथकांचं नेतृत्व महिला अधिकाऱ्यांनी केलं .*

*विविध राज्य आणि केंद्रसरकारी विभागांचे मिळून ३० चित्ररथ आपापल्या कामगिरीचं दर्शन घडवणारी दृष्यं धारण करुन मानवंदना देत होते. गणेशोत्सव या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथ लक्षवेधी ठरला.*

मुख्य सोहळ्यापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वीरजवान स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करुन देशासाठी प्राणांचं बलिदान देणाऱ्या शहीदांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यभरात शासकीय निमशासकीय कार्यालयं, शाळा महाविद्यालयं तसंच गृहनिर्माण संस्थांच्या आवारात ध्वजवंदनासह अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

प्रजासत्ताक दिनाचा राज्याचा मुख्य सोहळा मुंबईत दादर इथल्या शिवाजी पार्क मैदानात पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, मुंबईचे पालक मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह पोलीस अधिकारी, मान्यवर आणि नागरिक या सोहळ्याला उपस्थित होते.

यावेळी मुख्यमत्र्यांनी राज्यातल्या जनतेला संबोधित केलं. राज्यघटनेतल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या मूल्यांमुळेच देश वेगाने प्रगती करत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**होल्ड बाईट**

महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचं इंजिन असून, दावोस इथल्या जागतिक आर्थिक परिषदेत राज्यानं ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार करून नवा विक्रम प्रस्थापित केल्याचं त्यांनी सांगितलं.

सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वचनबद्ध आहे, नदीजोड प्रकल्पाद्वारे महाराष्ट्र दुष्काळमुक्त केला जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं. सौर कृषी वाहिनी आणि सौर पंपांच्या बाबतीत महाराष्ट्र जगात आघाडीवर असल्याचं त्यांनी सांगितलं. लाडकी बहीण योजना, मोफत वीज आणि प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाचा विकास केला जात असल्याचं ते म्हणाले. महाराष्ट्र भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुणे पोलिस मुख्यालयात झालेल्या सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं, तर ठाण्यात साकेत इथल्या पोलीस मैदानात झालेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयात झालेल्या सोहळ्यात आयुक्त तसंच प्रशासक भूषण गगराणी यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथल्या राष्ट्रीय मुख्यालयात तसंच चर्चगेट इथल्या पश्चिम रेल्वेच्या मुख्यालयात झालेल्या सोहळ्यात महाव्यवस्थापक विवेक कुमार गुप्ता यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

आकाशवाणी मुंबई केंद्राच्या आवारात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत केंद्र प्रमुख संजय बोदेले यांच्याहस्ते ध्वजवंदन झालं.

**नाशिकमध्ये** राज्याचे जलसंपदा आणि कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. **रत्नागिरीत** पोलीस कवायत मैदानावर झालेल्या सोहळ्यात पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं. **सांगली** इथं ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम विश्रामबाग सांगली इथं पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाला. **यवतमाळमध्ये** पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते पोस्टल ग्राउंडवर ध्वजारोहणाचा शासकीय कार्यक्रम पार पडला. **अहिल्यानगरमध्ये** पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. **धाराशिव** इथं पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते तर **जालना** इथं पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण झालं. **सातारा** जिल्हा क्रीडा संकुलात पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते, तर, **नांदेडमध्ये** छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आलं. **कोल्हापूर** इथं पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. **परभणी** इथं पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या उपस्थितीत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या हस्ते **लातुर** मधे मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आलं. **धुळे** इथल्या शासकीय ध्वजारोहण समारंभात जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी ध्वजारोहण करत जिल्हावासीयांना प्रजासत्ताकदिनाच्या शुभेच्छा दिल्या. **सिंधुदुर्ग** इथल्या ध्वजारोहण सोहळ्यात पालकमंत्री नितेश राणे यांनी ध्वजारोहण केलं. **हिंगोली** जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. **अमरावती** जिल्ह्यात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. या वेळी पद्मश्री पुरस्कार जाहीर झालेले जनार्दन बोथे गुरुजी उपस्थित होते. **गडचिरोली** इथं सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. **सोलापूर** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते तर **नवी मुंबईत** महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. **बुलढाण्यात** जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी राज्यातल्या नागरिकांना संबोधित केलं. महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत देशात आघाडीवर असून जागतिक गुंतवणूकदारांसाठी एक विश्वसनीय केंद्र म्हणून पुढे आला आहे, असं त्यांनी नमूद केलं. राज्यानं एक हजार अब्ज डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचं महत्त्वाकांक्षी ध्येय निश्चित केलं असून पायाभूत सुविधा आणि डिजिटल क्षेत्रात महाराष्ट्र देशाला दिशा देत असल्याचं राज्यपाल म्हणाले. राज्याची संत परंपरा आणि समृद्ध सांस्कृतिक वारशाचा उल्लेखही त्यांनी आपल्या संबोधनातून केला. महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक वाढीचं शक्तिशाली इंजिन असल्याचं ते म्हणाले. राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाप्रती त्यांनी कृतज्ञताही व्यक्त केली. राजकीय स्वातंत्र्यासोबतच सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देणं हेच राज्यघटनेचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्य सरकारच्या दीडशे दिवसांच्या ई गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमा अंतर्गत नऊ सरकारी कार्यालयांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याचं जाहीर करण्यात आलं आहे. भारतीय गुणवत्ता परिषदेच्या मूल्यांकानुसार या कार्यालयांची निवड झाल्याचं मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. यात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय, पनवेल महानगरपालिका, नाशिक पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर विभागीय आयुक्त कार्यालय, आणि नांदेड पोलीस महानिरीक्षक कार्यालयांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र सागरी मंडळ आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या कार्यालयांचाही यात समावेश आहे.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे पहिले भारतीय, ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांना आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अशोक चक्र हा शांततेच्या काळातला देशाचा सर्वोच्च शौर्य पुरस्कार प्रदान केला. ७७व्या प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर झालेल्या भव्य सोहळ्यात हा कार्यक्रम झाला. गेल्या वर्षीच्या जून महिन्यात ॲक्झिओम-४ या मोहिमेअंतर्गत शुभांशू शुक्ला हे अंतराळात जाणारे दुसरे, तर अंतराळ स्थानकावर राहणारे पहिलेच भारतीय ठरले.

**<><><><>**

विविध क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी  पद्म सन्मान जाहीर झालेल्या मान्यवरांमधे यंदा महाराष्ट्रातल्या ११ जणांचा समावेश आहे. त्यात कृषी क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामासाठी पद्मश्री पुरस्काराचे मानकरी ठरलेले परभणीचे श्रीरंगदादा लाड यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितलं…

**होल्ड- बाईट- श्रीरंगदादा लाड**

**पालघर** जिल्ह्यातले ज्येष्ठ आदिवासी तारपावादक भिकल्या धिंडा यांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

**<><><><>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ - बीसीसीआयचे माजी अध्यक्ष इंद्रजित सिंग बिंद्रा यांचं काल निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते.

**<><><><>**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी पेरलेल्या अनेक प्रेशर बॉम्बसचे स्फोट होऊन सुरक्षा दलाचे ११ जवान जखमी झाले आहेत. पोलीस

अधिकाऱ्यांनी आज ही माहिती दिली. नक्षलविरोधी कारवाईदरम्यान कर्रेगुट्टा डोंगरावरच्या जंगलांमध्ये हे स्फोट झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. यात राज्य पोलिसांच्या जिल्हा राखीव गार्डच्या १०, तर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या कोब्रा बटालियनच्या एका जवानाचा समावेश आहे. या मोहिमेदरम्यान सुरक्षा दलांनी ३५ शस्त्रं, ४५० सुरुंग, मोठ्या प्रमाणात डेटोनेटर्स, स्फोटक उपकरणं आणि १२ किलो इतर सामग्री जप्त केली आहे.

**<><><><><>**

महसूल गुप्तचर संचालनालयानं सातारा जिल्ह्यात मेफेड्रॉन या अंमली पदार्थाचं उत्पादन करणारं एक केंद्र उद्ध्वस्त करून ५५ कोटी रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. गेल्या शुक्रवारी ही कारवाई केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कराड तालुक्यातल्या एका गावात ऑपरेशन सह्याद्री चेकमेट अंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

**//<><><><><>//**